# जिल्हाधिकारी कार्यालय,रत्नागिरी.
# निविदा सूचना सन २०१०-११

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांचेकडील खाली नमूद केलेल्या कामासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा फॉर्म आणि अटी व शर्तीचा नमुना रक्कम रु.१००/- रोख भरुन **जिल्हाधिकारी कार्यालय (आस्थापना शाखा), रत्नागिरी-४१५ ६१२** येथून प्राप्त करुन घ्यावा.

यथोचितरित्या भरलेली आणि सर्व दृष्टीने परिपूर्ण निविदा **दिनांक १२/०८/२०१०** रोजी दुपारी **३.०० वाजेपर्यंत** स्विकारणेत येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजता कंत्राटदारांसमोर अथवा त्यांच्या प्रतिनिधीं समोर उघडण्यात येतील. कंत्राटदारांना त्यांची निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत आवश्यक ते करारपत्र करुन द्यावे लागेल.

सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही. करारनामा लिहून दिल्यानंतर दिलेल्या मुदतीत काम बिनचूक पूर्ण करुन द्यावे लागेल. कोणतेही साहित्य किंवा यंत्र सामुग्री या कार्यालयाकडून उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाचा टप्पा |
|---|---|---|
| १ | दिनांक १६/०८/२०१० पासून पोस्टाद्वारे प्राप्त होणारे अर्ज स्वीकारणे, अर्जाचे बंद लखोटे उघडून नमुन्याप्रमाणे यादी तयार करणे - दिनांक ३ सप्टेंबर,२०१० | **टप्पा क्रमांक ०१** निविदा दर प्रति १००० नमूद करावा |
| २ | कार्यालयाने पुरविलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करुन लेखी परीक्षेकरीता पात्र/अपात्र अर्जदारांची त्यांचे आडनांवानुसार यादी तयार करणे.- दिनांक १८ सप्टेंबर,२०१० पर्यंत | |
| ३ | पात्र उमेदवारांची नमुन्याप्रमाणे प्रवेशपत्रे तयार करणे व निर्गमित करणे - दिनांक ४ ऑक्टोबर,२०१० | **टप्पा क्रमांक ०२** निविदा दर प्रति १००० नमूद करावा |
| ४ | परीक्षा केंद्रनिहाय हजेरीपट तयार करणे - दिनांक १८ ऑक्टोबर,२०१० | |
| ५ | लेखी परीक्षेकरीता नमुना उत्तरपत्रिका (OMR) तयार करुन देणे, उत्तरपत्रिका नमुन्यास या कार्यालयाची मान्यता घेऊन उमेदवारांच्या संख्येनुसार उत्तरपत्रिकांची (OMR) छपाई करुन देणे - दिनांक १४ ऑक्टोबर,२०१० | **टप्पा क्रमांक ०३** निविदा दर प्रति नग |
| ६ | उमेदवारांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिकांची संगणकाद्वारे स्कॅनिंग व ऑटोमॅटीक पेपर तपासणी करुन उमेदवारांची प्रवर्गनिहाय प्राप्त गुणांची यादी तयार करुन देणे व गरजेनुसार प्रिंटआऊट काढून देणे, प्रवर्गनिहाय अंतिम निवड यादी तयार करुन देणे व याचा सर्व डाटा डीव्हीडीवर कॉपी करुन देणे- दिनांक २४ व २५ ऑक्टोबर,२०१० | |

| | | |
|---|---|---|
| ७ | अंतिम निवड व प्रतिक्षासूचीवर निवड झालेल्या उमेदवारांचे अर्ज स्कॅन करुन त्याची ०१ डीव्हीडी देणे - २५ ऑक्टोबर,२०१० | **टप्पा क्रमांक ०४** |
| ८ | परीक्षेनंतर अर्ज व उत्तरपत्रिका क्रमवार बाईडींग करुन देणे. (५० चा एक गठ्ठा याप्रमाणे) दिनांक २५ ऑक्टोबर,२०१० | |

वरील सर्व कामांसाठी एकत्रित निविदा दाखल करणे आवश्यक आहे. एक अथवा दोन कामांसाठीच्या निविदेचा विचार केला जाणार नाही. निविदेमधील दर कामाच्या वरील टप्प्याप्रमाणे देण्यात यावेत. निविदा मंजूर करताना वरील ०४ टप्प्यांमध्ये नमूद केलेल्या दरानुसार निविदेची एकत्रित किंमत विचारात घेण्यात येईल.

कंत्राटदाराला एका वेळी किमान १००० उमेदवारांच्या परीक्षेचे काम केल्याचा अनुभव आणि एका वेळी किमान १००० उत्तरपत्रिका (OMR) तपासण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. उपरोक्त स्वरुपाच्या कामाचा जास्त अनुभव असलेल्या कंत्राटदाराला प्राधान्य देण्यात येईल.

निविदा दोन लखोटा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. लखोटा क्रमांक १ (तांत्रिक बोलीचा लखोटा) मध्ये नोंदणीप्रमाणपत्र, आयकर/विक्रीकर प्रमाणपत्र सादर करणेची आहेत. लखोटा क्रमांक २ (निविदेचा लखोटा) मध्ये दराची निविदा सादर करणेची आहे. लखोटा क्रमांक १ मध्ये निविदेमधील कामांचा अनुभव असल्याबाबतची कागदपत्रे व साधनसामुग्री असल्याबाबतची कागदपत्रे, तसेच नोंदणी प्रमाणपत्र, आयकर, विक्रीकर, पॅन, टॅन, व्हॅट बाबतची कागदपत्रे सादर करणेची आहेत. लखोटा क्रमांक १ उघडल्यानंतर लखोटा क्रमांक २ उघडण्यात येईल.

कोणतीही निविदा अगर निविदेतील कोणताही भाग, कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्याचा/राखून ठेवण्याचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क **जिल्हाधिकारी, रत्नागिरी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, रत्नागिरी** यांनी राखून ठेवला आहे. निविदेबाबतची आवश्यक ती माहिती **जिल्हाधिकारी कार्यालय (आस्थापना शाखा), रत्नागिरी-४१५ ६१२ (दूरध्वनी क्रमांक ०२३५२-२२३५७३) येथे कार्यालयीन वेळेत मिळू शकेल.**

**सही /- मधुकर भि.गायकवाड**
**जिल्हाधिकारी, रत्नागिरी तथा**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, रत्नागिरी**

**क्रमांक आस्थापना-१/तलाठी संवर्ग पदभरती/सीआर-१८/२०१०**
**जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.**
**दिनांक- ३०/०७/२०१०**